ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052 (UIF) VOLUME - 6 | ISSUE - 10 | APRIL - 2017

GOLDEN RESEARCH THOUGHTS

# संत तुकारामाचे पर्यावरणविषयक विचार

मोरे प्रमोद अनिले
(टी.वाय. बी. ए.(मराठी) ) , मु.सा.काकडे महाविद्यालय सोमेश्वरनगर.



प्रस्तावना-

महाराष्ट्रला फार मोठी संत परंपरा लाभली आहे. वारकारी पंथाला पूजनीय , वंदनीय असलेल्या संत ज्ञानेश्वर , संत नामदेव , संत एकनाथ , संत तुकाराम या संताची आपल्या कार्याची दिशा आणि अंतिम ध्येय एकच ठरविले होते . पण प्रयत्न आणि माध्यम यात फरक होता . भागवत धर्माचा पाया घालणारे संत नामदेव म्हणजेच पूर्णत्व तर संत नामदेव भागवत धर्माचे प्रचारक आणि विस्तारक होते . संत एकनाथांनी नेटका प्रपंच करून उत्तम परमार्थ केला .समर्थ रामदासांनी देशकारण , समाजकारण , राजकारण यासाठी संपूर्ण देशाटन करून महाराष्ट्र धर्म जागवला , तर त्यांचेच समकालीन संत तुकारामांनी प्रपंच विन्मुख होऊन परमार्थाची साधना केली व भागवत धर्माचा कळस बनले .

महाराष्ट्रातील अकरा कोटी मराठी जनतेपैकी ८० % घरांमध्ये जगतगुरू तुकारामांची भाषा ही सर्वसाधारण समाजाची बोलीभाषा असून समजण्यास अत्यंत सोपी आहे . मोजक्या शब्दात मांडलेला स्पष्ट आशय व माधुर्य वाढवणारी यमक जुळणी ही संत तुकारामांच्या अभंगाची ठळक विशिष्टये आहेत . शेती हेच उपजीविकेचे साधन आपल्या अभंगातून पांडुरंगाच्या दर्शनप्राप्तीचा मार्ग दाखविताना दिलेले सर्व दृष्टान्त निसर्ग व ‘पर्यावरण ’ या विषयाशी निगडीत आहेत . आध्यात्मासारखा किचकट विषय सर्व सामान्यांना पटकन कळावा म्हणून तुकोबांनी दैनदिन व्यवहार व सभोवतीच्या निसर्गात घडणाऱ्या घटनांचे दृष्टान्त (दाखले) पदोपदी दिले आहेत .

पर्यावरण ही संकल्पना आधुनिक शब्दव्यवहारातील वाटत असली तरी मुख्येतेकरून पर्यावरणाचा विचार भारतीय संतांनी केलेला दिसून येतो . त्यांची त्यांच्या अभंगातून पर्यावरणातील अनेक नैसर्गिक घटकांचे दर्शन घडवून आणले .तसे पाहिले तर पर्यावरणाची व्याप्ती विस्तृत आणि मोठी आहे . मानवी जीवनामध्ये ज्या – ज्या सजीवांशी मानवाचा संबध येतो . ते सर्व संजीव पर्यावरणाशी संबधीत असतात या संजीवांमध्ये अनेक प्रकारच्या वनस्पती , प्राणी , पक्षी , वेगवेगळे सूक्ष्मजीव आणि मानव अशा सर्वचा अंर्तभाव होतो . पर्यावरणाच्या इतर घटकांमध्ये अजैविक समजल्या जाणाऱ्या हवा , पाणी , जमिन , डोंगर इ. गोष्टींचाही समावेश होतो .वृक्ष , वेली , झाडे , झुडपे, नदया , दलदलीच्या जागा माळरान अभयारण्ये उद्याने अशा वेगवेगळ्या ठिकाणी

सजीवांचे अस्तित्व असते . सूर्यचंद्र यांचा प्रकाश ओ पाऊस वारे , आद्रता , तापमान , अशा हवामानविषयक घटकांवर संजीवांचा जीवनक्रम अवलंबून असतो . आणि त्यामुळे पर्यावरण या शब्दाची व्याप्ती विस्तारित होत जाते . आसपास असणाऱ्या सर्व जैविक आणि अजैविक घटकांचा समावेश पर्यावरणामध्ये होतो .

आपला देश ज्या अवस्थेतून चालला आहे . आणि महासत्ता होण्याचे स्वप्न आपण सगळे बघत आहोत. तरीही आजच्या विज्ञानाच्या युगात,युवपिढीवर जाणीवपूर्वक या अभंगाचे संस्कार व्हावेत,म्हणून हा प्रयत्न आहे. पर्यावरण पर्यायाने निसर्गामधील घटना या सगळ्यांकडे पाहण्याचा संत तुकारामांचा दृष्टीकोन समजून घेणे , पर्यावरणाकडे पाहण्याचे सदाचार, सद्विचार आजच्या युवापिढीमध्येनिर्माण होणे गरजेचे आहे. त्यामुळे आजही संत तुकारामांचे अभंग प्रमाण मानणाऱ्या मराठी जनतेला तुकारामांच्या अंभागातील पर्यावरणाविषयक विचारांची आठवण करून देऊन पर्यावरणविषयक जागृती करणे हा या शोधनिबंधाचाउद्देश आहे.

तुकारामांच्या व्यक्तिमत्वातील प्राणी मात्राबद्दलचा स्ख्याभाव हा अतिशय संवेदनशील होते. तरल संवेदनशील मनाने तो माणसाकडे, निसर्गाकडे आणि प्राणीसृष्टीकडे, पाहतात.त्यांचे अंत:करण या सर्वाकडे पाहताना प्रेमाने ओथंबून गेलेले जाणवते. त्यांच्या प्रगल्भ, परिणत व्यक्ती मत्साचा व्यक्त होतो. कुणाबद्दलचीही द्वेष भावना त्यांच्या मनात नव्हती. प्राण्याबद्दलही ममत्वाची भावना त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. "कुणाही जीवाचा न घडो मत्सरग ही जाणीव त्यांनी कवितेत जशी मांडली आहे. तशीच ती त्यांच्या व्यक्तिमत्वामधून व्यक्त होते.

निसर्ग आणि पर्यावरण संदर्भात अतिशय मौलिक असा विचार त्यांच्या अंभागातून व्यक्त होतो. निसर्गाच्या सानिध्यात तुकारामांचेव्यक्तिमत्व फुलून येते. निसर्गातील चैतन्याचा अनुभव त्यांनी खालील अभंगातून किती समर्पकपणे मांडला आहे. त्याचा प्रत्यय येतो.

"वृक्षवली आम्हां सोयरी वनचरें |
पक्षी ही सुस्वरें आळविती ||१||
येणें सुखें रुचे एकांताचा वास |
नाही गुण दोष अंग येत ||धृ|| (२४८१) शां.गा

संत तुकारामांच्या काळातही वृक्ष तोडमोठया प्रमाणावर होत होती निसर्गाची झालेली ही हानी पाहून त्यांच्या मनाला वेदना होत होत्या. निसर्गाचे रक्षण केले तरच पर्यावरण चांगले राहते नाहितर निसर्गाचा प्रकोप मानवी जीवन उद्वस्त करून टाकते. त्यामुळेच त्यांचे मन सतत निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी धडपडीतूनच अनेक अंभगाची रचना
त्यांनी केली.

१) "तोडूनि पुष्पवाटिका फळवृक्षयाती | भाब्ळ राखती करून सार"
२) "महापुरे झाडे जाती| तेथे लव्हाळे वाचीत ||"
३) "पाण्यातील मासा | झोप घई कैसा || जावे त्यांचा वंशा तेव्हाळे||
४)भूतदया गाई पशूचें पालन तान्हेल्या जीवन वनामाजी||"
५) तरूवर बीजापोटी | बीज तरूवरा शेवटी||"

शेतकरी आणि निसर्ग याचा असणारा अनन्य संबध संत तुकारामानी अनेक अभंगातून व्यक्त केला . अनेकदा शेतकऱ्याला ओल्या किंवा कोरड्या दुष्काळाला बळी पडावे लागते. शेतकऱ्याने अतिशय चांगली सकस भूमि निवडली तरी तेवढ्याने भागात नाही. कारण अशा जमिनीतही निसर्गाच्या प्रकोपामुळे शुद्ध बीज पेरूनही हातात पीक येण्याची शाश्वती नसते. म्हणजेच उत्तम शेती किंवा उत्तम बी असले तरी त्याला पाण्याची जोड नसले तर किंवा अति पाणी झाले तर पीकयेत नाही. शेतकऱ्याला पाण्याशिवाय शेती व्यवसायाची कल्पनाही करता येत नाही. देह कितीही शृंगारला पण त्यात प्राणाच नसेल तर उपयोग काय? संत तुकारामांनी शुद्ध शेतीतील पाण्याला देहातील प्राणा इतकेच महत्व दिले आहे.

उदा:-

प्राण गेलिया शरीर |काय करिल व्यवहार |
तुका म्हणे जीवनेवीणा |पीक नव्हे नव्हे जाण|

या कठीण 'नव्हे-नव्हे' या शब्दाच्या दिवरुक्तीतून तुकोबांनी पाण्याचे अन्यनसाधरण महत्वच अधोरेखित केले आहे. अशाच प्रकारे पाण्याशी संबधित आणि शेतकरी जीवनाशी संबधीत अभंगरचना संत तुकारामानी केकेली आहे.

संत तुकारामांनी आपली अभंगरचना सर्वसामन्य लोकांसाठीच केली आहे. आत्मउद्धार बरोबरच त्यांनी नैसर्गिक जाणीव, पर्यावरण रक्षणासाठी आणि संवर्धनाची गरज १६ व्या शतकामध्ये ही सर्वसामन्य लोकांना करून दिली.पर्यावरणविषयक विचार असणारे अनेक अभंग आपल्याला त्यांच्या अभंगाथेमध्ये पहायला मिळतात.

उदा: मानवी शरीर व मनुष्यस्वभावाविषयीचे अभंग जमिनीविषयीचे अंभग हवा व वातावरणविषयीचे अंभग, वनस्पती व जलचर किटक या विषयीचे अभंग, पीके व अन्नधान्य या विषयीचे अंभग या सर्वच अभंगातून संत तुकारामांनी पर्यावरणाचा मानवी जीवनात असणारा उपयोग सांगतला आहे. निसर्गातील अनेक घटकांकडे मानवाने कशाप्रकारे पाहिला पाहिजे . निसर्गाचा आपल्या जीवनात कसा उपयोग करून घतले पाहिजे. या सगळ्यांचा विचार अनेक दृष्टांतातून संत तुकारामांनी केकेला आहे. या विचारातून पर्यावरणाकडे पाहण्याचा एक विधायक दृष्टीकोन संत तुकाराम आपल्याल देतात त्यामुळे त्यांचे पर्यावरण विषयक विचार आजच्या पिढीलाही उपयुक्त आणि प्रेरणादायक ठरणारे आहेत असे वाटते.

## संदर्भ ग्रंथ

१)संत तुकाराम वाङ;मय आणि तत्वज्ञान पुणे विद्यापीठ मराठी विभाग व तत्वविज्ञान विभाग आयोजित राष्ट्रीय चर्चासत्र फेब्रुवारी २०१०.

२)समाज जीवनातील तुकाराम-पाटील तानाश्री पद्मगंधा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती २००८.

३) संत साहित्याचे सामाजिक फलश्रुती ग.बा.सरदार महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे दु.आ.१९६२

४) भारतीय संताचे योगदान-संपादक डॉ.स्नेहल तावरे स्नेहवर्धन प्रकाशन पुणे. (प्र.आ.२०१५).